# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.म.चि./ ५२२२ /सु.स.,
मुंबई, दि. ११ ऑगस्ट २०११.

प्रति,
श्री. मनोज कि. कोटक,
नगरसेवक.

**संदर्भ** :- आपले दि. १०.८.२०११ चे पत्र.

सुधार समितीच्या दि. ५ ऑगस्ट २०११ रोजी भरलेल्या सभेत पुढील ठराव* संमत करण्यात आला आहे असे मी आपणास कळवू इच्छितो :-

**विषय क्रमांक १५ (ऑगस्ट २०११)**

'' **संदर्भ** : आयुक्तांचे दि. २३.६.२०११ चे पत्र क्र. सआमा/७०१७/मक्ता.

**क्रमांक ६९.** '' सुधार समितीने आपल्या दि. २६ मार्च २००८ च्या ठराव क्र. १८५ मध्ये अंशतः फेरफार करून महानगरपालिकेला तिच्या दि. ७ एप्रिल २००८ चा ठराव क्र. ८१ च्या संदर्भात अशी शिफारस करण्यात यावी की, आयुक्तांच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, १) मक्तेदार मालमत्तेचे निव्वळ हस्तांतरण करीत असताना, २) विकासक मक्तेदाराकडून मालमत्ता खरेदी करुन पुनर्विकास करीत असताना, ३) विकासकास मालमत्तांचा पुनर्विकास करण्यासाठी मक्तेदाराने अधिकार पत्रे दिल्यानंतर, आणि ४) मूळ मक्तेदार स्वतः मालमत्तेचा पुनर्विकास करीत असताना, हस्तांतरण शुल्क वसूल करण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयासापेक्ष, अद्ययावत् सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ९२ मधील प्रस्तावित बदलास, राज्य शासनाची मंजुरी मिळण्यासापेक्ष, पुढे नमूद केल्यानुसार हस्तांतरण शुल्क लागू करण्यास, अद्ययावत् सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ९२ (डीडी) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी.

**अ)** मक्ता दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिमूल्याच्या १०% किंवा मुद्रांक शुल्क निवासी सिध्दगणक दरानुसार येणाऱ्या मक्ता भूखंडाच्या जमिनीच्या किंमतीच्या १०% यापैकी जे जास्त असेल ते हस्तांतरण शुल्क,

**ब)** वाणिज्य भूखंडाकरिता मक्ता भूभागाच्या जमिनीच्या किंमतीचे परिगणन करताना मुद्रांक शुल्क सिध्दगणक दर, निवासी वापराच्या सिध्दगणकाच्या २ पट (२००%) व औद्योगिक मक्ता भूभागाच्या जमिनीच्या किंमतीचे परिगणन करताना मुद्रांक शुल्क सिध्दगणक दर निवासी वापराच्या सिध्दगणकाच्या १.२५ पट (१२५%) हस्तांतरण शुल्क,

**क)** मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणी झालेल्या शैक्षणिक उद्दिष्टांसाठीच्या नोंदणीकृत संस्था, वैद्यकीय, धार्मिक आणि कल्याणकारी उद्दिष्टांसाठीच्या नोंदणीकृत संस्था यांच्यासाठी परिगणन करताना मुद्रांक शुल्क सिध्दगणक निवासी वापराच्या दराच्या ०.२५ पट (२५%) हस्तांतरण शुल्क,

**ड)** जर मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणी झालेल्या शैक्षणिक उद्दिष्टांसाठीच्या नोंदणीकृत संस्था, वैद्यकीय, धार्मिक आणि कल्याणकारी उद्दिष्टांसाठीच्या नोंदणीकृत संस्था ह्यांनी सदरची मालमत्ता मक्त्यात नमूद केलेल्या व्यतिरिक्त इतर वापर किंवा नोंदणीकृत संस्थेव्यतिरिक्त खाजगी व्यक्ती किंवा खाजगी संस्था ह्यांना हस्तांतरित केली तर वापरानुसार हस्तांतरण शुल्क. मात्र, सदर हस्तांतरण शुल्क निवळ मक्ता हस्तांतरण तसेच पुनर्विकासातून होणारे हस्तांतरण यासाठी लागू असेल,

''२. महानगरपालिकेला अशीही शिफारस करण्यात यावी की, आयुक्तांच्या पत्रामधील क्र. १ ते ३ येथे नमूद केलेल्या बाबींना राज्य शासनाची मंजुरी मिळविण्याकरिता महानगरपालिकेच्यावतीने राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करण्याचे अधिकार, सुचविल्याप्रमाणे, आयुक्तांना देण्यात यावेत.

''३. हा ठराव महानगरपालिकेच्या कोणत्याही चालू सभेपुढे तातडीचे कामकाज म्हणून आणण्यात यावा.''

**महानगरपालिका चिटणिसांकरिता.**